**सिगारेट, बिडी, तंबाखू ग्राहकांसाठी महत्वाची बातमी: शौक 'महंगी' चीज है!** >> पान 2

**पाकिस्तानमध्ये सत्तासंघर्षाला सुरुवात! असीम मुनीर यांच्या सीडीएफ नियुक्ती आधीच शाहबाज गेले परदेशात पळून** >> पान 3

**लोणार नगरपरिषद निवडणूक : तिरंगी लढत तापली** >> पान 4

### सुविचार

ज्याची कसलीही मागणी नसते तो सम्राट असतो. – महर्षि कणाद


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 116 ■ मंगळवार, दि. 02 डिसेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




मराठमोळ्या अभिनेत्रीच्या प्रेमात पडलाय टीम इंडियाचा स्टार श्रेयस अय्यर

# हिवाळी अधिवेशनाला निवडणूक पराभवाचं मैदान बनू नये, निराशेतून बाहेर या

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांवर हल्लाबोल



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विरोधी पक्षाच्या नेत्यांना पराभवाच्या निराशेवर मात करण्याचा सल्ला दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ''ज्याला ड्रामा करायचा आहे तो ते करु शकतो. इथं, ड्रामा नव्हे तर डिलीव्हरी असावी. धोरणांवर भर दिला पाहिजे, घोषणांवर नाही.'' त्यांनी पुढं म्हटलं की, ''हे अधिवेशन देशाच्या प्रगतीसाठी आहे आणि पराभवाबद्दलची निराशा व्यक्त करण्यासाठी त्याचा वापर केला जाऊ नये.''

भारतानं लोकशाही जगली : हिवाळी अधिवेशन सुरु होण्यापूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संसद भवनात सांगितलं की, ''हे अधिवेशन देशाला प्रगतीकडे नेण्याच्या प्रयत्नांना ऊर्जा देईल. भारतानं लोकशाही जगली आहे. वेळोवेळी लोकशाहीवर विश्वास दृढ करणाऱ्या पद्धतीनं लोकशाहीचं प्रदर्शन केलं आहे. बिहार निवडणुकीत मतदारांची उपस्थिती ही लोकशाहीची एक मोठी ताकद आहे.''

हिवाळी अधिवेशनात लोकप्रतिनिधी म्हणून मुद्दे उपस्थित करा : पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ''एकीकडे लोकशाहीची ताकद आहे आणि दुसरीकडे अर्थव्यवस्थेची ताकद आहे, ज्यावर जग बारकाईनं लक्ष ठेवून आहे. भारतानं सिद्ध केलं आहे की, लोकशाही चांगली कामगिरी करु शकते. भारताचा आर्थिक विकास ज्या वेगानं नवीन उंचीवर पोहोचत आहे, त्यामुळं आपल्याला विकसित भारताच्या ध्येयाकडं वाटचाल करण्यासाठी नवीन बळ मिळतं. विरोधी पक्षांनी आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे आणि मजबूत मुद्दे उपस्थित केले पाहिजेत. पराभवाच्या निराशेवर मात केली पाहिजे. काही पक्षांना पराभव पचवता येत नाही. मी आग्रह करतो की, हिवाळी अधिवेशनाला पराभवाचं मैदान बनू देऊ नये किंवा विजयाचा अहंकार विकसित होऊ देऊ नये. लोकप्रतिनिधी म्हणून आपण इथं आपले मुद्दे उपस्थित केले पाहिजेत.''

तरुण खासदारांना संधी मिळावी : पंतप्रधान मोदी म्हणाले, ''संसदेत नव्यानं निवडून आलेले सर्व पक्षांचे तरुण खासदार यांना त्यांच्या भागातील समस्या मांडण्याची संधी मिळत नाही. पक्ष कोणताही असो, आपण आपल्या तरुण खासदारांच्या नवीन पिढीला संधी दिली पाहिजे. सभागृहानं त्यांच्या अनुभवांचा फायदा घ्यावा.'' तसंच पुढं बोलताना मोदी म्हणाले, ''जीएसटी सुधारणांमुळं देशवासीयांच्या हृदयात आदराचं वातावरण निर्माण झालं आहे. या अधिवेशनातही त्या दिशेनं बरंच काम करायचं आहे. विरोधी पक्ष जनतेपर्यंत पोहोचू शकत नाही. त्यांचे विचार व्यक्त करू शकत नाही. त्यामुळं संसदेत गोंधळ घातला जातो. काही पक्षांनी ही एक नवीन परंपरा सुरु केली आहे. त्यांनी त्यांची रणनीती बदलण्याचा विचार करावा; मी सूचना देण्यास तयार आहे.

## एनआयएचे काश्मीरमध्ये ८ ठिकाणी छापे, दिल्ली स्फोटातील 'व्हाईट-कॉलर' कनेक्शनचा तपास सुरु

**शोपिया (श्रीनगर)/वृत्तसंस्था :** राष्ट्रीय तपास संस्थेनं सोमवारी काश्मीरमधील पुलवामा आणि कुलगाम जिल्ह्यात ८ ठिकाणी छापे मारले. दहशतवाद्यांनी दिल्लीमधील लाल किल्ल्याजवळ स्फोट घडवून आणल्यानंतर 'व्हाईट-कॉलर' हे दहशतवाद्यांचे मॉड्यूल समोर आले होते. त्या संदर्भात एनआयएनं जम्मू काश्मीरमध्ये छापे टाकले आहेत. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार एनआयएच्या पथकानं शोपियामधील मौलवी इरफान अहमद वागेच्या घरात झडती घेतली. व्हाईट कॉलरच्या दहशतवादी मॉड्यूलमधून कट्टरतावाद पसरविण्यासाठी आणि भरती करण्यात वागे हा मास्टरमाईंड असल्याची माहिती तपासात समोर आलं आहे.

ऑक्टोबरमध्ये दिल्लीत दहशतवाद्यांनी कारमधून घडवून आणलेल्या स्फोटात १५ लोकांचा मृत्यू झाला. या दहशतवादी हल्ल्याचा एनआयएकडून तपास सुरू असून संशयितांची चौकशी सुरू आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार पुलवामा जिल्ह्यात कोईल, चंदगाम, मलंगपोरा आणि संबूरा भागात छापेमारी केली. हे छापे दिल्लीमधील कार स्फोटाशी संबंधित आहेत

इरफान मौलवीच्या घरी छापे – नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात उत्तर प्रदेश सहारनपूरमधून डॉ. अदील अहमद राथरला अटक करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास सुरू असताना एनआयएनं दिल्ली कार स्फोटातील प्रकरणात जम्मू काश्मीरमधील नादिगाम शोपियामधील इरफान मौलवीच्या घरी छापे मारले. एनआयएनं दक्षिण काश्मीरमधील शोपिया जिल्ह्यात शोध मोहिम राबविली. या मोहिमेत नादिगामध्ये इरफान अहमद मौलवीच्या घरात छापे टाकले आहेत. सूत्राच्या माहितीनुसार एनआयएचं पथक सकाळी शोपिया येथे पोहोचलं. या पथकानं मौलवीच्या घराची झडती घेतली. दिल्ली कारच्या स्फोटात इरफान अहमद मौलवीची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. घरात टाकलेल्या छाप्यात काय कागदपत्रे आणि सामान जप्त केले, याची अधिकृतपणे माहिती देण्यात आलेली नाही.

कोण आहे इरफान मौलवी ? शोपियानमधील नदीगाम येथील रहिवासी इरफान अहमद मौलवी याची दिल्ली कार बॉम्बस्फोट प्रकरणात सहभाग असल्याचा तपास यंत्रणांना संशय आहे.

## शिवसेनेचे ३५ आमदार फुटणार, राऊतांच्या वक्तव्यावर एकनाथ शिंदेंनी लगावला टोला

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** राज्यातील २२ नगरपरिषदांच्या अध्यक्षपदाच्या निवडणुका पुढं ढकलण्यात आल्या आहेत. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सांगितलं की, ''एकदा निवडणूक प्रक्रिया सुरू झाली तर निवडणुका थांबवल्या जात नाहीत. मात्र, यावेळी थांबवल्या गेल्या. यावर पूर्ण माहिती घेऊनच मी बोलेन. या निवडणुकीत आम्ही गेल्या अडीच वर्षात केलेल्या कामांवरच प्रचार करत आहोत. मुख्यमंत्री किंवा मी, आम्ही कधी एकमेकांवर बोललो नाही. स्थानिक प्रश्न हे वेगळे असतात आणि ही निवडणूक कार्यकर्त्यांची आहे.'' यावेळी संजय राऊत यांच्या शिवसेनेचे ३५ आमदार फुटणार असल्याच्या दाव्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वक्तव्य केलं.

उपमुख्यमंत्री शिंदे काय म्हणाले? : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवडणूक आयोगाच्या कारवाईबाबत आपली प्रतिक्रिया देताना सांगितलं की,



''निवडणूक आयोग अनेक ठिकाणी धाडी टाकून चौकशी करत आहे. अशा चौकशा नेहमीच होत असतात.''

फडणवीस-शिंदे भेटीची चर्चा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोघंही पैठण दौऱ्यादरम्यान एकाच हॉटेलमध्ये मुक्कामी असल्यानं त्यांच्यात खासगी चर्चा झाल्याची जोरदार चर्चा सुरू होती. यावर बोलताना शिंदे म्हणाले, ''मी आधी आलो होतो, मुख्यमंत्री नंतर आले. पैठणमध्ये दोघांच्याही सभा आहेत. आमची फोनवर चर्चा होत असते. आमची चर्चा रोजच चालू असते. आम्ही नेहमीच एकमेकांशी संवाद करत असतो.''

'आम्ही एकमेकांवर टीका केली नाही' : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढं म्हणाले, ''प्रचारात मी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केलेत का? ही स्थानिक पातळीवरील निवडणूक आहे. स्थानिक प्रश्न हे वेगळे असतात. ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. आम्ही फक्त गेल्या अडीच वर्षात केलेल्या कामांवरच प्रचार करत आहोत.'' तसेच, निवडणूक ऐनवेळी थांबवल्याबाबत ते म्हणाले की, ''निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर याआधी कधीही निवडणुका थांबवल्या गेलेल्या नाहीत. पण यावेळी दुर्दैवानं तसं घडलं. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर अशा पद्धतीनं निवडणुका कधीच थांबवल्या जात नाहीत. मी याबाबत पूर्ण माहिती घेऊनच यावर बोलणार आहे.''

'संजय राऊत यांना शुभेच्छा' : उबाठा पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी ''शिवसेनेचे ३५ आमदार फुटणार'' असल्याचं मोठं विधान केलं होतं. यावर शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना माध्यमांनी प्रश्न विचारला असता, त्यांनी हसत-हसत हात जोडले आणि म्हटलं की, ''मी संजय राऊत लवकर बरे व्हावेत, यासाठी शुभेच्छा देतो,'' असं म्हणून ते निघून गेले.

## धुळे हादरलं! गुरुद्वाराचे प्रमुख बाबा धीरजसिंग यांच्यावर जीवघेणा हल्ला, सेवेकऱ्यानेच तलवारीने केले वार

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील एका गुरुद्वारामध्ये अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. गुरुद्वाराचे प्रमुख बाबा धीरजसिंग यांच्यावर गुरुद्वारातीलच एका सेवेकऱ्याने तलवारीने प्राणघातक हल्ला केला आहे. या हल्ल्यात बाबा धीरजसिंग गंभीर जखमी झाले असून त्यांच्यासह अन्य एक जण जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धुळे शहरातील गुरुद्वारामध्ये ही घटना घडली. गुरुद्वाराचे प्रमुख असलेले बाबा धीरजसिंग हे गुरुद्वारामध्ये बसून वर्तमानपत्र वाचत होते. त्याच वेळी, उमेश नावाच्या सेवेकऱ्याने अचानक त्यांच्यावर तलवारीने हल्ला चढवला. हा हल्ला इतका अचानक आणि भीषण होता की, बाबा धीरजसिंग यांना सावरण्याची संधी मिळाली नाही. या प्राणघातक हल्ल्यात बाबा धीरजसिंग हे गंभीर जखमी झाले आहेत. तसेच, त्यांना वाचवण्यासाठी धावलेले बाबा रणवीरसिंग हे देखील जखमी झाले. अशाप्रकारे रक्तपात घडल्याने गुरुद्वारामध्ये एकच गोंधळ उडाला.

## १६ जिल्ह्यांतील नगरपरिषद, नगरपंचायतीमध्ये सार्वजनिक सुट्टी रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत आहे. यापूर्वी मतदानाच्या दिवशीची जाहीर केलेली सुट्टी काही मतदारसंघात न्यायालयीन अपील दाखल झाल्यामुळे केवळ त्या मतदारसंघापुरती रद्द करण्यात आली आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी १६ जिल्ह्यांतील नगरपरिषद आणि नगरपंचायतीमध्ये सार्वजनिक सुट्टी रद्द करण्यात आली आहे. यात ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, नेवासा, पुणे जिल्ह्यातील बारामती, फुरसुंगी-उरुळी देवाची, सोलापूर जिल्ह्यातील अनगर, मंगळवेढा, सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, फलटण, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री, नांदेड जिल्ह्यातील मुखेड, धर्माबाद, लातूर जिल्ह्यातील निलंगा, रेणापूर, हिंगोली जिल्ह्यातील वसमत, अमरावती जिल्ह्यातील अंजनगावसूर्जी, अकोल्यातील बाळापूर, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, देऊळगावराजा, वर्धा (देवळी) आणि चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस यांचा समावेश आहे, असे सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे

## पनवेलमध्ये एकाच व्यक्तीला २६८ मुलं, मतदानाआधी सगळ्यात मोठा घोळ समोर

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. उद्या २ डिसेंबरला राज्यात सर्वत्र मतदान घेतलं जाणार आहे. मतदानाच्या आदल्या दिवशी पनवेल महापालिका हद्दीत मतदार यादीतील सर्वात मोठा घोळ समोर आला आहे. इथं एका व्यक्तीला एक दोन नव्हे तर तब्बल २६८ मुलं असल्याचं समोर आलं आहे. एवढंच नव्हे तर हे सर्वजण एकाच घरात राहत असल्याचं मतदार यादीतून स्पष्ट होतं आहे. हा सगळा घोळ समोर आल्यानंतर शेकापचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी खळबळजनक दावे केले आहेत. मतदार यादीत आढळलेले हे सर्व मतदान उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशातील असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणी तोडगा निघाला नाही, तर आपण मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहिती देखील म्हात्रे यांनी दिली. हा सगळा प्रकार पनवेल महापालिकेच्या हद्दीतील प्रभाग क्रमांक दोन मधील मतदार यादीमध्ये आढळला आहे. इथं एका व्यक्तिला चक्क २६८ मुले असल्याचं उघड झालंय.




# निवडणूक आयोगाने चुकीचा अर्थ लावला, निवडणुका रद्द करणे अत्यंत चुकीचे

## देवेंद्र फडणवीसांचा निवडणूक आयोगावर हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी निवडणूक आयोगानं काही नगर परिषदेच्या निवडणुका रद्द करण्याच्या घेतलेल्या निर्णयावर जोरदार टीकास्त्र डागलंय. न्यायालयीन प्रक्रियेमुळे राज्यातील जवळपास २२ नगरपरिषदांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. पुढे ढकललेल्या निवडणुकांसाठी आता २० डिसेंबरला मतदान होणार असून, २१ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. विशेष म्हणजे उर्वरित ठिकाणांच्या निवडणुका ठरलेल्या तारखेनुसार २ डिसेंबरला नियोजित वेळेत होणार आहेत. त्याच संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारलं असता, त्यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयाला केराची टोपली दाखवली आहे. ते छत्रपती संभाजीनगरमध्ये माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते.

निवडणुका रद्द करणं हे अत्यंत चुकीचं : काही निवडणुका अचानक रद्द झाल्यात, त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. उद्या मतदान आणि काल त्या निवडणुका रद्द झाल्यात, असं विचारलं असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मला असं वाटतं की निवडणूक आयोगानं कायद्याचा चुकीचा अर्थ लावलेला आहे. या निवडणुका रद्द करणं हे अत्यंत चुकीचं आहे. अशा पद्धतीनं तर प्रत्येक वेळी कोणीही कोर्टात जाईल आणि मग निवडणूक पोस्टपाँड होईल, असं कधीच आजपर्यंत झालेलं नाही.

कुणीही आमचा शत्रू नाही, ते राजकीय विरोधक : तसेच संजय राऊत बरे झाले ही आनंदाची गोष्ट आहे. ते त्यांचे काम करतात, आम्ही आमचे काम करतो, पण कुणीही आमचा शत्रू नाही ते राजकीय विरोधक आहेत. कुठलाही राजकीय विरोधक आजारी पडला तर तो लवकर बरा झाला पाहिजे ही आमची आशा असते. ते रोज काही काही बोलतात त्यावर मी उत्तर देत नाही, त्यांचे आरोप उत्तर देण्याच्या लायकीचे मी समजत नाही, अशी टीका त्यांनी केली.

निवडणूक आयोग स्वायत्त आहे : कुठला नवा कायदा निवडणूक आयोग



काढतंय, कोणाचा सल्ला निवडणूक आयोग घेतंय ह्याची मला कल्पना नाही. मी अनेक वकिलांशी बोललो, त्या सगळ्यांचं मत आहे की, अशा पद्धतीनं एखादा व्यक्ती कोर्टात गेलीय म्हणून निवडणुका पुढे ढकलता येत नाहीत. काल संभाजी पाटील निलंगेकर माझ्याशी बोलले, निलंग्याचं उदाहरण घेतल्यास निलंग्यात सगळी प्रक्रिया पूर्ण झाली. एक कोणी तरी ज्याचा फॉर्म रद्द झाला होता, तो कोर्टात गेला. कोर्टानं त्याचा फॉर्म रिजेक्ट केला. तो स्वीकारला नाही. त्यामुळे मग ज्यांनी फॉर्म भरले त्यांना पूर्ण वेळ मिळाला. परत घेण्याचा पूर्ण वेळ मिळाला. प्रचाराचा पूर्ण वेळ मिळाला. कोणी तरी कोर्टात गेलं म्हणून निवडणूक पोस्टपाँड करणं हे अत्यंत चुकीचं आहे. अर्थात निवडणूक आयोग स्वायत्त आहे, त्यामुळे त्यांना निर्णय घेण्याचा अधिकार आहे. पण माझं म्हणणं आहे, निवडणूक आयोगानं या निवडणुका पोस्टपाँड केलेल्या आहेत, त्या पूर्ण पणे चूक आहेत. निवडणूक आयोगाचा निर्णय मान्य करावा लागेल, पण माझं मत आहे की तो चुकीचा निर्णय आहे, असंही देवेंद्र फडणवीस म्हणालेत.

## जनतेला गोंधळ नव्हे, तर काम अपेक्षित

संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. बिहार निवडणुकीच्या निकालांनी एनडीएचे चेहरे उजळले आहेत, तर विरोधकांमध्ये निराशा आहे. हे वातावरण अधिवेशनातील प्रत्येक दिवशी जाणवणार आहे. बिहारमध्ये भाजप-जदयू युतीच्या मोठ्या विजयाने सरकारला नवी ऊर्जा मिळाली. पंतप्रधान आणि वरिष्ठ मंत्री हा निकाल जनतेचा स्पष्ट जनादेश असल्याचे सांगत आहेत. त्यांचा अंदाज आणखी तीव्र होईल. त्यांच्या राजकीय हल्ल्यांत आत्मविश्र्वास दिसेल. सरकार पूर्वीच्या निर्णयांना योग्य ठरवण्याचा प्रयत्न करेल. दुसरीकडे काँग्रेस आणि इंडिया आघाडी अद्याप निवडणूक पुनरावलोकनातच अडकली आहे. त्यांची एकजूट पूर्वीइतकी भक्कम दिसत नाही. अनेक पक्ष आता हे मानू लागले आहेत की, काँग्रेसकडे विरोधकांचे नेतृत्व करण्याची क्षमता नाही. हा मतभेद संसदेच्या कामकाजातही दिसून येईल. सरकारमध्येही हालचालींच्या चर्चा आहेत. कॅबिनेटमध्ये फेरबदलाची शक्यता वाढली आहे. काही मंत्री बदलले जाऊ शकतात, काही नवी चेहरे येऊ शकतात. विरोधकांसाठी हे अधिवेशन सोपे नाही. ते एसआयआर, मतदानात गैरप्रकार आणि निवडणुकीतील पारदर्शकता यांसारख्या मुद्द्यांवर सरकारला घेरू इच्छितात; पण बिहारच्या विजयाने सरकारला नवा तर्क मिळाला आहे तो म्हणजे, जनता विरोधकांचे आरोप नाकारत आहे. त्यामुळे विरोधकांच्या मुद्द्यांची धार बोथट होईल. त्यांच्या दाव्यांना पूर्वीसारखा प्रभाव राहणार नाही. दिल्लीतील वाढते प्रदूषणही तापलेला मुद्दा बनेल. काँग्रेस आणि आप दोन्ही केंद्र सरकार आणि दिल्ली सरकारवर हल्ला चढवतील. त्यांचा दावा असेल की, 'डबल इंजिन सरकार' प्रदूषणावर नियंत्रण आणण्यात अपयशी ठरले आहे. केंद्र सरकार म्हणेल की, हवा हा फक्त दिल्लीचा नव्हे, तर अनेक राज्यांचा संयुक्त प्रश्र्न आहे. चर्चा लांबेल; पण उपाय होईल, असे दिसत नाही. लाल किल्ल्याजवळ झालेला स्फोट आणि फरिदाबादमधील दहशतवादी हालचालीचाही मुद्दा विरोधक उचलतील. ते सुरक्षा त्रुटींवर प्रश्र्न उपस्थित करतील. सरकार हे राष्ट्रीय सुरक्षेचे प्रश्र्न असल्याचे सांगत विरोधकांवरच दबाव टाकेल. अशा काळात सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे, असे ते म्हणतील. त्यामुळे विरोधकांची आक्रमकता कमी होऊ शकते. अधिवेशन लहान आहे. फक्त पंधरा बैठकांचे. वेळ कमी आणि मुद्दे खूप. विरोधकांकडे बोलण्याची संधीही मर्यादित आहे आणि त्यांचा प्रभावही. घोषणाबाजी, वॉकआऊट हे होणारच; पण जनतेला आता फक्त गोंधळ नव्हे, तर काम अपेक्षित आहे. ही धारणा सरकारला फायद्याची ठरेल. सरकार म्हणेल की, 'विकास रोखणारे राजकारण' स्वीकारणार नाही. सरकार या सत्रात दहा विधेयके मंजूर करून घेण्याच्या तयारीत आहे. प्रत्येक बैठकीत काम व्हावे, अशी सरकारची इच्छा आहे. एनडीएची एकजूट हेच त्यांचे सर्वात मोठे बलस्थान आहे. सहयोगी पक्षांत फारसा असंतोष नाही. त्यामुळे सरकारला अडचण येण्याची शक्यता नाही. महागाई आणि इंधन दरांवर विरोधक सरकारवर हल्ला करतील. सरकार जागतिक अर्थव्यवस्थेतील संकटांचे कारण देईल. ते सांगतील की, भारत आता जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था झाला आहे. हा तर्क लोकांना पटू शकतो. विरोधक प्रयत्न करतील; पण सरकारकडे बचावासाठी पुरेशी आकडेवारी आहे. रोजगारही मोठा मुद्दा ठरेल. तरुणांमधील बेरोजगारी वाढत आहे. विरोधक म्हणतील की, सरकारच्या योजनांतून रोजगार निर्माण होत नाही. सरकार मात्र स्टार्टअप, डिजिटल इंडिया आणि वाढत्या गुंतवणुकीचा उल्लेख करून रोजगाराचे चित्र सकारात्मक असल्याचे सांगेल. चर्चेतून कदाचित उपाय मिळणार नाही; पण राजकीय संदेश नक्कीच पोहोचेल. परराष्ट्र धोरणावरही चर्चा होईल. इस्रायल-हमास युद्ध, रशिया-युक्रेन संघर्ष आणि आशिया-प्रशांत प्रदेशातील तणाव या पार्श्वभूमीवर भारताची भूमिका काय, यावर विरोधक प्रश्र्न करतील. यावर सरकारची पूर्ण तयारी आहे. त्यांच्या हातात नवीन आंतरराष्ट्रीय रिपोर्ट असून तो भारताच्या शक्तीचे प्रमाण देत आहे. ऑस्ट्रेलियाच्या लोवी इन्स्टिट्यूटने आशिया पॉवर इंडेक्स २०२५ जाहीर केला. त्यानुसार भारत आता अमेरिका आणि चीननंतर जगातील तिसरी सर्वात मोठी शक्ती ठरला आहे. ही उपलब्धी सरकारसाठी सर्वात मोठे राजकीय शस्त्र ठरेल. सरकार सांगेल की, भारताची अर्थव्यवस्था, सेना आणि आंतरराष्ट्रीय प्रभाव नवीन उंची गाठत आहे. २०२४ मध्ये भारताचा स्कोर ३९.१ होता व तो 'मध्यम शक्ती' गटात होता. २०२५ मध्ये तो ४० झाला आणि भारत 'मोठ्या शक्तीं'च्या यादीत पोहोचला. रिपोर्ट म्हणतो की, 'ऑपरेशन सिंदूर'च्या अनुभवामुळे भारताची संरक्षण क्षमता मजबूत झाली आहे. जपान आता भारताच्या खाली आहे. पाकिस्तान सोळाव्या क्रमांकावर आहे. अमेरिकेचा स्कोर घसरला आहे. ही तुलना भारताच्या उभारणीला अधिक ठळक करते. सरकार हे सर्व आपली धोरणे यशस्वी ठरल्याचे प्रमाण म्हणून दाखवेल. विरोधकांना या उपलब्धीवर फारसे प्रश्र्न विचारता येणार नाहीत. अहवालात आणखी एक महत्त्वाची गोष्ट नमूद आहे. परकीय गुंतवणुकीत भारताने चीनला मागे टाकले आहे. अमेरिकेनंतर भारत आता जगातील दुसर्या क्रमांकाचे एफडीआय डेस्टिनेशन बनला आहे. सरकार हे आर्थिक स्थिरता आणि विश्वासाचे फलित असल्याचे सांगेल. या तर्काने विरोधकांची टीका कमकुवत होईल. भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाचा हा पुरावा अधिवेशनातील चर्चेची दिशा बदलेल. दरम्यान, कर्नाटकातील राजकारणही राष्ट्रीय चर्चेचा विषय झाले आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यातील सत्ता संघर्ष आता लपलेला नाही. भाजप हे प्रकरण संसदेत नक्कीच उचलणार. कर्नाटकातील तणाव दिल्लीपर्यंत पोहोचला आहे. ही परिस्थिती संसदेत विरोधकांची ताकद आणखी कमी करेल. प्रत्येक अधिवेशनात समीकरणे बदलतात. यावेळी समीकरणे स्पष्ट आहेत. सरकार मजबूत, विरोधक विस्कळीत. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा कळस वाढलेला. देशांतर्गत मुद्द्यांवर तणाव. जनता अपेक्षा करते की, संसदेत ठोस कामकाज होईल; पण खरी चर्चा राजकीय संदेशांभोवतीच फिरेल. हिवाळी अधिवेशनात चर्चा होईल, संघर्ष होतील, आरोप-प्रत्यारोप होतील. काही विधेयके पास होतील, काही अपुरी राहतील; पण मोठा प्रश्र्न हाच आहे की, संसद जनतेला हे पटवून देऊ शकेल का की, लोकशाही फक्त निवडणूक नाही, तर संवादही आहे? कोण मजबूत आणि कोण कमकुवत, हे स्पष्ट होईल. बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत भारताची ताकद राजकीयरीत्या कशी वापरली जाईल, हेही दिसून येईल. अधिवेशन लहान असले, तरी त्याचा परिणाम मोठा असेल. पुढील महिन्यांच्या राजकारणाचा मार्ग ते ठरवेल.

# सिगारेट, बिडी, तंबाखू ग्राहकांसाठी महत्वाची बातमी: शौक 'महंगी' चीज है!

## अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी एनसीएस विधेयक लोकसभेत मांडले !

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जीएसटी सेसमध्ये फेरबदल करण्यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी लोकसभा हिवाळी अधिवेशनातील सत्रात मोठे विधेयक (ॅ) मांडले आहे. तंबाखू आणि संबंधित अथवा चैनीच्या वस्तू, उत्पादनांवर अधिक शुल्क आकारण्या साठी आणि पान म साल्याच्या उत्पादनावर नवीन उपकर लावण्यासाठी दोन विधेयके सादर केली गेली आहेत. केंद्रीय उत्पादन शुल्क दुरुस्ती विधेयक, २०२५ आणि आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक, २०२५ हे तंबाखू आणि पान मसाला सारख्या हानिकारक वस्तूंवरील कराचा आकार भरपाई उपकर बंद केल्यानंतरही तोच राहील यासाठी ही दोन विधायके म ांडली गेली आहेत. पाप वस्तूंवरील या प्रवर्गात येत असलेल्या वस्तूंवर जीएसटी भरपाई बदललेल्या उपकराची जागा घेणार आहे अशी प्राथमिक माहिती पुढे आली आहे. ज्या अंतर्गत अर्थमंत्र्यांनी बील सादर केले ते केंद्रीय उत्पादन शुल्क (सुधारणा) विधेयक, २०२५ जीएसटी भरपाई उपकराची जागा घेणार आहे. सध्या सिगारेट, तंबाखू, सिगार, हुक्का, जर्दा आणि तंबाखू संबंधित इतर वस्तू यासारख्या सर्व तंबाखू उत्पादनांवर आकारला जातो. जीएसटीवरील उपकर भरपाई संपल्यानंतर बीलातील उद्दिष्टे आणि कारणांच्या विधानानुसार कराच्या घटनांचे संरक्षण करण्यासाठी तंबाखू आणि तंबाखू उत्पादनांवर केंद्रीय उत्पादन शुल्काचा दर वाढवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असेल. या बीलाप्रमाणे सरकार अशा कोणत्याही वस्तूंच्या उत्पादनावर असा उपकर लावू शकते हे अधोरेखित सरकारने केले आहे.

तंबाखू आणि पान म साल्यासारख्या (पाप) वस्तूंवर सध्या २८म जीएसटी आहे, तसेच विविध दरांनी आकारला जाणारा भरपाई उपकर आहे. केंद्रीय उत्पादन शुल्क दुरुस्ती विधेयकात सिगार, चेरूट्स, सिगारेटवर प्रति १००० काड्यांवर ५००० ते ११००० रुपयांपर्यंत उत्पादन शुल्क आकारण्याचा प्रस्ताव या विधेयकाअंतर्गत दिला गेला आहे. सध्या सिगारेटवर लांबीनुसार ५म जाहिरात मूल्याधारित भरपाई उपकर आणि प्रति १००० काड्यांवर २०७६-३६६८ रुपये उपकर आकारला जातो. माहितीनुसार,नव्या बदलाप्रमाणे अनिनिर्मित तंबाखूवर ६०-७०म आणि निकोटीन आणि इनहेलेशन उत्पादनांवर १०% कर आकारण्याचा प्रस्ताव सदनापुढे अर्थमंत्र्यांनी ठेवला आहे. एकदा भरपाई उपकर संपला की, तंबाखू आणि संबंधित उत्पादनांच्या विक्रीवर ४०म जीएसटी आणि उत्पादन शुल्क आकारले जाईल, तर पान मसाल्यावर ४०म जीएसटी आणि आरोग्य सुरक्षा उपकर आकारले जाणार आहे.'सार्वजनिक आरोग्यासाठी तसेच राष्ट्रीय सुरक्षेसाठी लक्ष्यित वापर सक्षम करणे या दुहेरी उद्देशांना हातभार लावण्यासाठी आरोग्य सुरक्षा



उपकर आकारण्याचा प्रस्ताव आहे' असे विधेयकाच्या उद्दिष्टे आणि कारणांच्या निवेदनात म्हटले आहे.

१ जुलै २०१७ रोजी जीएसटी लागू करताना, जीएसटी अंमलबजावणीम ुळे राज्यांना झालेल्या महसुली नुकसानाची भरपाई करण्यासाठी ३० जून २०२२ पर्यंत ५ वर्षांसाठी भरपाई उपकर यंत्रणा लागू करण्यात आली होती. नंतर भरपाई उपकर आकारणी चार वर्षांनी वाढवून ३१ मार्च २०२६ पर्यंत करण्यात आली आणि कोविड काळात राज्यांना झालेल्या जीएसटी महसुलाच्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी केंद्राने घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी या वसुलीचा वापर केला जात आहे.माहितीनुसार, त्या कर्जाची परतफेड डिसेंबरमध्ये केव्हातरी पूर्णपणे परतफेड होणार असल्याने भरपाई उपकर अस्तित्वात राहणार नाही. यापूर्वी ३ सप्टेंबर २०२५ रोजी, जीएसटी कौन्सिलने घेतलेल्या कर्जाची परतफेड होईपर्यंत तंबाखू आणि पान मसाल्यावरील भरपाई उपकर सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला होता. इतर चैनीच्या वस्तूंवर, भरपाई उपकर २२ सप्टेंबर रोजी संपला असूनस जीएसटी तर्कसंगतीकरण ५% आणि १८% अशा फक्त २ स्लॅबसह लागू करण्यात आले होते.याशिवाय अती चैनीच्या (अल्ट्रा-लक्झरी वस्तू) एरेटेड पेये आणि इतर गैर-लाभकारी वस्तूंसाठी ४० टक्के दर निश्चित करण्यात आला आहे.

## अजितदादांच्या इशाऱ्याने पुण्यातील 'राजकीय दादा' घाबरले

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रचार सभांचा धडाका लावला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक भागासाठी आतापर्यंत किती निधी दिला आणि भविष्यात विकासासाठी किती निधी देणार, हे सांगण्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भर दिला आहे. बहुतांश ठिकाणी महायुतीतील मित्रपक्ष भाजप आणि शिवसेना (शिंदे) पक्षाशी लढत द्यावी लागत असल्याने अजितदादांनी जिल्ह्यातील राजकीय दादागिरी, हा प्रचाराचा प्रमुख मुद्दा केला आहे. 'दादागिरी करणाऱ्यांना सोडणार नाही' असा इशारा अजितदादांनी दिल्याने जिल्ह्यातील राजकीय पक्षांतील 'दादां'ची घाबरगुंडी उडाली आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी पुणे जिल्ह्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायती ताब्यात ठेवण्यासाठी स्वत: लक्ष दिले आहे. त्यासाठी ते ठिकठिकाणी प्रचार सभा घेत आहेत. गेल्या आठवड्यात बारामतीतील माळेगाव बुद्रुक येथे पहिली प्रचार सभा घेतली. त्याच दिवशी बारामती येथे सभा घेऊन प्रचाराचा नारळ फोडला. त्यानंतर जिल्ह्यातील १४ नगर परिषदा आणि तीन नगर पंचायतींच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री पवार हे प्रचार सभा घेत आहेत.

## आईबाबांसाठी ठेवलेला स्टेटस भावाने बघितला अन्.., कल्याणमध्ये घडली भयंकर घटना

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण पश्चिमेकडील चिकणघर परिसरात एका ३० वर्षीय तरुणाचा काळा तलावात मृतदेह आढळला आहे. संबंधित तरुणाने शनिवारी रात्री आपल्या आई वडिलांना उद्देशून व्हॉट्सअॅपवर स्टेटस ठेवलं होतं. हे स्टेटस तरुणाच्या लहान भावाने बघितला. त्याला संशय आला. त्याने आपल्या भावाला सगळीकडे शोधलं पण त्याचा काहीच थांगपत्ता लागला नाही, शेवटी जेव्हा पोलिसांच्या मदतीने शोध घेतला तेव्हा या तरुणाचा मृतदेह काळा तलावात आढळला आहे. प्रदीप किसन भोईर (वय ३०) असं या तरुणाचं नाव आहे. त्याने आत्महत्या केल्याची माहिती मिळत आहे. प्रदीप हा कल्याण पश्चिमेतील चिकणघर परिसरातील हरीओम सोसायटीमध्ये आपल्या कुटुंबीयांसोबत राहत होता. शनिवारी रात्रीच्या सुमारास प्रदीप घरातून बाहेर पडला. त्यानंतर काही वेळाने त्याने व्हॉट्सअॅपवर एक स्टेट्स अपलोड केला. आई बाबा मला माफ करा, असा मेसेज तरुणाने स्टेटसवर ठेवला होता. हा मेसेज प्रदीपचा भाऊ रमाकांत भोईर याने पाहिला. मेसेज वाचताच त्याला संशय आला आणि त्याने तातडीने कुटुंबीयांच्या मदतीने प्रदीपचा परिसरात शोध सुरू केला, परंतु प्रदीप कुठेही सापडला नाही.अखेरीस, कुटुंबीयांनी महात्मा फुले चौक पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी तातडीने शोध मोहीम सुरू केली आणि तपासानंतर प्रदीपचा मृतदेह काळा तलावात आढळून आला. त्यामुळे प्रदीपने आत्म हत्या केल्याचे स्पष्ट झाले.प्रदीपच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. त्याने टोकाचे पाऊल का उचलले असावे, त्याच्या आत्महत्येमागे कोणते कारण असावे, या प्रश्नांचा उलगडा करण्याचा महात्मा फुले चौक पोलीस प्रयत्न करत आहेत. यासंदर्भात मृत प्रदीपचा भाऊ रमाकांत भोईर याने दिलेल्या माहितीनुसार पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

## मराठमोळ्या अभिनेत्रीच्या प्रेमात पडलाय टीम इंडियाचा स्टार श्रेयस अय्यर; कधीकाळी बोल्ड बॅकलेस फोटोमुळे आलेली चर्चेत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** काही दिवसांपूर्वी मैदानात गंभीर जखमी झालेला टीम इंडियाचा स्टार क्रिकेटपटू श्रेयस अय्यर सध्या रिकव्हरी स्टेजला आहे. पण, सध्या दुखापतीतून सावरत असलेला श्रेयस अय्यर चर्चेत आला आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान खेळल्या गेलेल्या वनडे सीरिजमध्ये श्रेयस नुकताच भारताचा उपकर्णधार म्हणून दिसला होता. त्याच सीरिजमध्ये श्रेयसला गंभीर दुखापत झालेली. आता उपचार घेत असलेल्या श्रेयसच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. पण, तुम्हाला माहितीय का? सध्या श्रेयस अय्यरच्या डेटिंगच्या चर्चा रंगल्या आहेत. तेसुद्धा मराठमोळ्या अभिनेत्रीसोबत.

मीडिया रिपोर्टनुसार, टीम इंडियाचा स्टार खेळाडू श्रेयस अय्यरचं सूत जुळलं आहे. तो एका मराठमोळ्या अभिनेत्रीच्या प्रेमात अडकला आहे. एका रेडिट युजरनं श्रेयस अय्यरच्या डेटिंगबद्दल मोठा दावा केला आहे. युजरनं म्हटलंय की, श्रेयस अय्यर गपचूक आपलं प्रकरण पुढे नेतोय. श्रेयस अय्यरचं ज्या मराठमोळ्या अभिनेत्रीसोबत सूत जुळलंय ती अभिनेत्री म्हणजे, अभिनेत्री मृणाल ठाकूर. आधी साऊथ फिल्म इंडस्ट्री आणि त्यापाठोपाठ बॉलिवूडमध्ये झळकलेल्या मृणाल ठाकरूनं अनेक लो बजेट मूव्हीसुद्धा हिट केलेत. तिच्या आजवरच्या बऱ्याच सिनेमांनी बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई केली आहे. अशातच बॉलिवूडच्या हिट अभिनेत्रीचं नाव श्रेयस अय्यरशी जोडलं जात आहे.

रेडिटवर शेअर करण्यात आलेल्या एका पोस्टनुसार, मृणाल आणि श्रेयस गेल्या काही महिन्यांपासून रिलेशनशिपमध्ये आहेत. या पोस्टमध्ये असंही म्हटलंय की, या दोघांचं नातं प्रायमरी स्टेजला आहे आणि त्यांना ही बाब सध्या खासगीतच ठेवायचीय. श्रेयस आणि मृणालच्या अफेअरच्या चर्चा समोर येताच, नेटकऱ्यांनी श्रेयस आणि मृणाल यांच्या जोडीला लगेचच स्विकारलंय... एवढंच काय तर, चाहत्यांनी दोघांचं नाव जोडून एक हॅशटॅग तयार केलाय. युजर्सनी क्षएपीब्रत असा खास कपल हॅशटॅग तयार केलाय. हा हॅशटॅग सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

साऊथच्या सुपरस्टार्सच्या यादीत आपलं स्थान निर्माण केलेला अभिनेका धनुष, नेहमीच आपल्या वेगळ्या धाटणीच्या सिनेमांमुळे चर्चेत असतो. धनुषनं थलायवा सुपरस्टार रजनीकांत यांच्या मुलीशी लग्नगाठ बांधली होती. त्यानंतर ऐश्वर्या आणि धनुषनं आपल्या सुखी संसारातून काडीमोड घेत वेगळं होण्याचा निर्णय घेतला. पण, त्यानंतर त्याचं नाव मृणाल ठाकूरशी जोडलं गेलं होतं. दोघेही एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले असून डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आलेलं.

# कधी आणि कुठं होणार IND vs SA दुसरा वनडे सामना? रोहित-विराट पुन्हा दिसणार मैदानात

**रायपूर/वृत्तसंस्था :** भारत आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघातील वनडे मालिका सध्या सुरु आहे. भारतीय क्रिकेट संघानं तीन साम न्यांच्या वनडे मालिकेतील पहिला सामना १७ धावांनी जिंकला आहे. यासह, टीम इंडियानं मालिकेत १-० आघाडी घेतली आहे. आता सर्वांचं लक्ष मालिकेतील दुसऱ्या सामन्यावर लागलं आहे. मालिकेतील दुसरा साम ना कधी आणि कुठं खेळला जाईल असा प्रश्न चाहत्यांच्या मनात निर्माण झाला आहे.



**टीम इंडियानं पहिला सामना १७ धावांनी जिंकला :** केएल राहुलच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघानं दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिला वनडे सामना जिंकला आहे. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियानं ५० षटकांत आठ गडी गमावून ३४९ धावा केल्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेनं ४९.२ षटकांत ३३२ धावा केल्या, ज्यामुळं भारताला १७ धावांचा विजय मिळाला. भारतीय संघाच्या सर्वाधिक धावसंख्या असूनही, दक्षिण आफ्रिकेनं चांगला खेळ केला आणि शेवटच्या षटकापर्यंत सामना जिवंत ठेवला.

**दुसरा वनडे सामना ३ डिसेंबरला होईल :** आता मालिकेतील पुढील दुसरा सामना ३ डिसेंबर रोजी रायपूर इथं खेळवला जाईल. पहिल्या आणि दुसऱ्या वनडे सामन्यांमध्ये फारसं अंतर नाही. याचा अर्थ असा की टीम इंडिया आणि दक्षिण आफ्रिका लवकरच रांचीहून रायपूरला रवाना होतील. हा सामना बुधवारी होणार आहे. रायपूरमध्ये बऱ्याच काळानंतर आंतरराष्ट्रीय सामना होत आहे, त्याम ुळं या सामन्याभोवती भरपूर उत्साह आहे.

**३ वर्षांनी रायपूरला होणार आंतरराष्ट्रीय सामना :** खरं तर, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील दुसरा साम ना रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. या मैदानावर जवळजवळ ३ वर्षांपासून एकही एकदिवसीय सामना खेळवला गेलेला नाही. येथे शेवटचा एकदिवसीय सामना २१ जानेवारी २०२३ रोजी भारताचा न्यूझीलंडशी सामना झाला होता. त्यावेळी टीम इंडियाचे नेतृत्व रोहित शर्मा करत होते. रोहित शम ांच्या शानदार अर्धशतकामुळे भारताने न्यूझीलंडला ८ विकेटने हरवले. आता, भारतीय संघ केएल राहुलच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेच्या संघाशी सामना करणार आहे.

**भारतातील तिसरं सर्वात मोठं स्टेडियम :** शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेलेला शेवटचा सामना १ डिसेंबर २०२३ रोजी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील टी-२० सामना होता. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघानं ऑस्ट्रेलियाचा २० धावांनी पराभव केला. आता, २ वर्षांनंतर, रायपूर स्टेडियम आंतरराष्ट्रीय सामन्याचे साक्षीदार बनण्यास सज्ज झाले आहे. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमची आसन क्षमता ६५,००० आहे. आसन क्षमतेच्या बाबतीत हे भारतातील तिसरं सर्वात मोठं क्रिकेट स्टेडियम आहे. त्यामुळं इथं मोठ्या संख्येनं चाहते अपेक्षित आहेत.

**रोहित शर्मा आणि विराट कोहली पुन्हा उतरणार मैदानात :** रांची इथं खेळल्या जाणाऱ्या पहिल्या सामन्यात रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या कामगिरीनं सामन्याभोवतीचा उत्साह आणखी वाढवला आहे. विराट कोहलीनं रांची कसोटीत शतक झळकावलं तर रोहित शर्मानंही आपलं अर्धशतक दमदारपणे पूर्ण केले. कर्णधार केएल राहुलनंही सहाव्या क्रमांकावर फलंदाजी केली आणि संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# पाकिस्तानमध्ये सत्तासंघर्षाला सुरुवात! असीम मुनीर यांच्या सीडीएफ नियुक्ती आधीच शाहबाज गेले परदेशात पळून

**कराची/वृत्तसंस्था :** पाकिस्तानमध्ये लष्करी नेतृत्वाबाबत एक मोठे संवैधानिक आणि प्रशासकीय संकट निर्माण झाले आहे. फील्ड मार्शल असीम मुनीर यांना देशाचे पहिले संरक्षण दल प्रमुख(सीडीएफ) म्हणून नियुक्त करण्याचा आदेश २९ नोव्हेंबरपर्यंत जारी होणार होता. परंतु, शाहबाज सरकारने याबाबत कोणतीही अधिसूचना दिली नाही. दरम्यान, माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य तिलक देवेशर यांनी दावा केला की पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी जाणूनबुजून या प्रक्रियेपासून स्वत:ला दूर ठेवले आहे.

तिलक देवेशर यांच्या मते, ''असीम मुनीर यांच्या मुदतवाढीच्या आदेशावर किंवा सीडीएफ नियुक्तीच्या आदेशावर स्वाक्षरी



करावी लागू नये म्हणून शाहबाज शरीफ आधी बहरीन आणि नंतर लंडनला रवाना झाले. याबाबत पंतप्रधानांनी खूप काळजीपूर्वक पाकिस्तान सोडला आहे. कारण त्यांना आदेशावर स्वाक्षरी करण्याचे राजकीय आणि संस्थात्मक परिणाम माहित आहेत.'' असीम मुनीर यांचा तीन वर्षाचा कार्यकाळ २९ नोव्हेंबर रोजी संपला आणि जोपर्यंत नवीन अधिसूचना जारी केली जात नाही तोपर्यंत पाकिस्तानकडे तांत्रिकदृष्ट्या लष्करप्रमुखाचे पद रिक्त राहणार आहे. या नवीन व्यवस्थेमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. ज्यामुळे अणु कमांड प्राधिकरण देखील सीडीएफच्या अंतर्गत येते. देवेशर यांनी हे पाकिस्तानसाठी 'अत्यंत असामान्य आणि धोकादायक परिस्थिती' म्हणून वर्णन केले आहे.

या मुद्द्यावर कायदेशीर तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत. काहींचा असा विश्वास आहे की २०२४ मध्ये पाकिस्तान आर्मी ॲक्टमधील दुरुस्तीमुळे आर्मी स्टाफ प्रमुखांना आपोआप पाच वर्षाचा कार्यकाळ मिळतो. ज्यामुळे नवीन आदेशाची आवश्यकता गरजेची नाही. तर काहींचा असा युक्तिवाद आहे की, सीडीएफसारख्या नवीन पदाच्या निर्मितीवर औपचारिक अधिसूचना अनिवार्य आहे. शाहबाज शरीफ यांच्या अनुपस्थितीमुळे केवळ राजकीय तणाव वाढला नाही तर पाकिस्तानसारख्या अण्वस्त्र सज्ज देशात लष्करी नेतृत्वाला इतके अनिश्चित ठेवणे सुरक्षित आहे का? असे प्रश्नही उपस्थित झाला आहे.

दरम्यान, पाकिस्तानच्या संविधानात करण्यात आलेल्या २७ व्या घटनादुरुस्तीमुळे देशात तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र चर्चा रंगली आहेत. संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार उच्चायुक्त वोल्कर तुर्क यांनी या दुरुस्तीबाबत गंभीर चिंता व्यक्त करताना म्हटले की, या बदलांमुळे पाकिस्तानमध्ये लष्कराची सत्ता अधिक बळकट होण्याचा धोका आहे आणि याचा थेट परिणाम न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यावरही होऊ शकतो. त्यांच्या मते, या घटनादुरुस्तीमुळे लष्करप्रमुख असीम मुनीर यांना अधिक अधिकार मिळण्याची शक्यता असून, नागरिक सत्तेच्या स्वायत्ततेवर मर्यादा येण्याचा धोका निर्माण झाला आहे.

## आईवरुन शिवी दिल्याने मित्राचाच केला शेवट, रस्त्याकडेला केबलने गळा आवळून केला खून



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूरच्या गोखले कॉलेज ते हॉकी स्टेडियम रोडवरील विश्वपंढरीसमोर फुटपाथवर इलेक्ट्रिक पोलला असणाऱ्या केबलने गळा आवळून एका तरुणाचा संशयास्पद खून झाल्याची घटना सोमवारी पहाटे उघडकीस आली. मात्र स्थानिक गुन्हे शाखा आणि जुना राजवाडा पोलीसांच्या पथकाने तात्काळ तपास करत अवघ्या काही तासांतच आरोपी मनिष जालिंदर राऊत (वय २८ ) याला कळंबा परिसरातून अटक केली आहे. दारूच्या नशेत झालेल्या किरकोळ वादाने रागावलेल्या संशयित आरोपीने मित्र असलेल्या सिद्धू शंकर बनबी (वय २०) याचा गळा आवळून खून केल्याची कबुली दिली आहे.

## कोल्हापुरात सात वर्षीय चिमुरडीवर अत्याचाराचा प्रयत्न, मुलीनं आरडाओरडा केला अन्..

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूरमध्ये अवघ्या सात वर्षाची चिमुरडीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. मात्र, संबंधित मुलीने आरडाओरडा केल्याने मोठा अनर्थ टाळला. अत्याचाराचा प्रयत्न करणारा २८ वर्षीय नराधम विकास कांबळेला इस्पूर्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार संबंधित मुलगी आईसोबत एका नातेवाईकाच्या लग्नाला गेली होती. यावेळी नराधम विकास कांबळेस सुद्धा होता. कोल्हापुरातील कात्यायनी ते गिरगाव दरम्यान रस्त्यावरील उसाच्या शेतात सात वर्षीय चिमुरडीला ओढून ऊसाच्या शेतात नेत अत्याचा करण्याचा प्रयत्न केला. यावेळी पीडिताने मोठ्याने आरडाओरडा केल्याने अनर्थ टळला. इस्पूर्ली पोलिसांनी आरोपी विकास कांबळेला ताब्यात घेतलं आहे.

## महिन्याच्या पहिल्याच दिवशी ग्राहकांना धक्का; आज सोनं-चांदी महागली

**मुंबई/प्रतिनिधी :** महिन्याच्या पहिल्याच दिवशी सोन्याच्या दरांनी मोठी उसळी घेतली आहे. सोन्याबरोबरच चांदीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. आज ६०० रुपयांनी सोनं वधारलं आहे. तर चांदीच्या दरातही साधारण ३००० रुपये प्रति किलो वाढ झाली आहे. देशात सोनं-चांदीच्या दरात किती वाढ झाली आणि आजचे दर काय जाणून घेऊयात. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेच्या व्याज दरात कपात होण्याची शक्यता असतानाच सोनं पुन्हा एकदा वधारलं आहे. गुंतवणुकदारांनी सोन्यात दाखवलेली रुची आणि जगभरातून मिळणारा चांगला प्रतिसाद यामुळंही सोन्याच्या दरात वाढ नोंदवली आहे.

आज २४ कॅरेट सोन्याच्या दरात ६६० रुपयांची वाढ झाली असून १,३०,४८० रुपयांवर सोनं पोहोचलं आहे. तर २२ कॅरेट सोन्याच्या दरात ६०० रुपयांची वाढ झाली असून २४ कॅरेट सोनं १,१९,६०० रुपयांवर पोहोचलं आहे. १८ कॅरेट सोन्याच्या दरात ४९० रुपयांची वाढ झाली असून ९७,८६० रुपयांवर सोनं पोहोचलं आहे.

## अनगरची निवडणूक स्थगित, निवडणूक आयोगाचे निर्देश; राष्ट्रवादीच्या उज्ज्वला थिटेंची पहिली प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील अनगर आणि मंगळवेढा नगराध्यक्षपदासाठीची निवडणूक स्थगित करण्यात आली असून नव्याने कार्यक्रम जाहीर होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर येथील निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केलेल्या आणि ज्यांच्या उमेदवारीने वाद निर्माण झाला त्या उज्ज्वला थिटे यांनी निवडणूक स्थगितीवर प्रतिक्रिया दिली. तसेच, अनगरच नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत सोलापूर सत्र न्यायालयाने आमचा अर्ज फेटाळला असली तरी आम्ही उच्च न्यायालयात दाद मागणार आहोत. तोपर्यंत निवडणूक आयोगाने ही निवडणूक स्थगित करावी, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील ६ नगरपालिकांमधील विविध प्रभागातील निवडणुकाही स्थगित झाल्या आहेत.

अनगर नगरपंचायत निवडणुकीला जी स्थगिती मिळाली त्याचा आनंदच म्हणावा लागेल. मला वाटतं नियतीचे फासे फिरलेत, पाटील परिवाराने किती वेळा आनंद साजरा करायचं हे त्यांनीच ठरवावं, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार राहिलेल्या उज्ज्वला थिटे यांनी लगावला. मला उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अनेक अडथळे आले, तांत्रिक बाबीमुळे माझा अर्ज बाद झाला. कोर्टात देखील माझ्या विरोधात निकाल गेला, अधिकृत निकालाची प्रत आज संध्याकाळी मला मिळेल. त्यानंतर, आम्ही उच्च न्यायालयात जाणार आहोत, अशी माहिती उज्ज्वला थिटे यांनी दिली. तसेच, जोपर्यंत उच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही, तोपर्यंत निवडणुकीला स्थगिती राहावी, अशी मागणी मी करणार असल्याचंही त्यांनी म्हटलं.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, अर्ज बाद झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उज्वला थिटे यांना अर्ज भरण्याची संधी उपलब्ध नाही. अनगर नगरपंचायतमध्ये एकमेव अर्ज राहिलेल्या प्राजक्ता पाटील यांना अर्ज माघार घेण्याची संधी मिळेल. जर प्राजक्ता पाटील यांनी उमेदवार अर्ज माघारी घेतला नाही तर निवडणूक आयोगाला केवळ एक अर्ज शिल्लक आहे, असं कळवलं जाईल. त्यानंतर, अनगर बिनविरोधची अधिकृत घोषणा केली जाईल,असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

## कागलला शिंदे गट एकाकी पडल्यानंतर ठाकरे गटाला सुद्धा झटका; मतदानाला काही तास असतानाच नगराध्यक्ष उमेदवाराची थेट माघार

**मुंबई/प्रतिनिधी :** कागल नगरपरिषद निवडणुकीमध्ये एकावर एक उलटफेर सुरूच आहेत. पहिल्यांदा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे यांनी अनपेक्षितरित्या नगरपरिषद निवडणुकीसाठी आघाडी केल्यानंतर कार्यकर्ते सुद्धा बुचकळ्यात पडले होते. आता त्या दोघांचा एकत्रित प्रचार सुरू असताना शिवसेना शिंदे गटाची मात्र गोची झाली आहे. शिंदे गट एकाकी पडला असतानाच आता शिवसेना ठाकरे गटाला सुद्धा तगडा झटका कागल नगरपरिषद निवडणुकीमध्ये बसला आहे. कागल नगरपालिकेतील नगराध्यक्ष उमेदवार शारदा नागराळे यांनी निवडणुकीतून थेट माघार घेतल्याने राजकीय भूवचा उंचावल्या आहेत. त्यामुळे मतदानासाठी अवघे काही तास बाकी असताना कागल नगरपरिषदेमध्ये पुन्हा एकदा राजकीय घडामोडी घडल्या आहेत.

दरम्यान, शारदा नागराळे यांनी फक्त निवडणुकीत माघार घेतली नसून त्यांनी थेट घाटगे आणि मुश्रीफ यांच्या आघाडीला पाठिंबा दिला आहे.

## धक्कादायक! मुंबईत 'हेवी डिपॉझिट'च्या नावाखाली पैसे उकळण्याचे प्रकरण उघड

### घर भाड्याने घेताना नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** हेवी डिपॉझिट'च्या नावाखाली फसवणुक करणाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ही वाढ विशेषत: मुंबईमध्ये झाल्याचे दिसते. मुदत संपल्यावर अनामत रक्कम परत न करणे, घर मालकाच्या नकळत घर दुसऱ्याला भाड्याने देणे किंवा एकाच घरासाठी अनेकांकडून डिपॉझिटच्या स्वरूपात पैसे उकळणे असे प्रकार वाढले असल्याने याविरोधात मुंबई शहरातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये अनेक गुन्हे दाखल झाल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडीत राहणाऱ्या एका तरुणीच्या वडिलांनी मुंबईतील वांद्रे-माहीम परिसरात घर भाड्याने घेण्याचा निर्णय घेतला. याबाबत एका तरुणाने आईच्या नावावर घर असल्याचे सांगून चार लाख रुपये हेवी डिपॉझिट म्हणून घेतले. मात्र, घराची चावी देण्यास उशीर झाला म्हणून चौकशी केल्यावर हा तरुण आणि त्याच्या आईने अनेकांना अशाच प्रकारे फसवल्याचे समोर आले आहे.

दुसरीकडे, वांद्रे-कुर्ला संकुल परिसरात एका शिलाईकाम करणाऱ्याने चार लाखांचे हेवी डिपॉझिट देऊन खोली भाड्याने घेतली. मुदत संपल्यावर पैसे परत मागितले असता, घर मालकिणीने टाळाटाळ करत धमक्या देण्यास सुरुवात केली. तर वरळीतही असा



प्रकार समोर आला. एका मालकाने बाराव्या मजल्यावरील खोली अकरा महिन्यांच्या आगाऊ भाड्यावर दिली होती. मुदत संपण्यापूर्वी मालक चौकशीला पोहोचला असता, भाडेकरूने मालकाच्या नकळत तीच खोली दुसऱ्याला पंधरा लाख रुपये हेवी डिपॉझिटवर भाड्याने दिल्याचे उघड झाले आहे.

'हेवी डिपॉझिट' म्हणजे काय?

घर भाड्याने घेताना घरमालकाला मोठी अनामत रक्कम देणे आणि त्या बदल्यात मासिक भाडे कमी किंवा अजिबात न भरणे. करार संपल्यावर किंवा घर सोडताना ही अनामत रक्कम भाडेकरूला परत मिळते. यामुळे घरमालकाला एकाच वेळी मोठी रक्कम मिळते, ज्यावर तो व्याज मिळवू शकतो. तर भाडेकरूला दरमहा भाडे देण्याची गरज नसते व शेवटी त्याला संपूर्ण रक्कम परत मिळते. दरम्यान, हे गैरप्रकार रोखण्यासाठी घरमालकांसह भाड्याने घर घेण्याच्या विचारात असणाऱ्या नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.


## शब्दकोडे क्र. 25

आडवे शब्द

१. 'सांगत्ये ऐका' या चित्रपटातील गाजलेल्या लावणीची सुरुवात १०. थंड, शीतल ११. एक मिश्र धातू १२. चामखीळ १४. मीलन, भेट १६. एकटा १७. चतकोर १८. मोठा भाऊ १९. चौघड्याबरोबरचे वाद्य २१. मार्गक्रमण २२. दिवाळीतील ऋतू २६. शहाणा, सूज्ञ २६. तृण २८. पुरुष ३०. गुंग, रममाण ३१. समाजातील दबदबा ३६. दहावी रास ३८. फुरसत ४०. आपले राष्ट्रगीत ४३. एका वर्षाचा बारवा भाग ४५. भेदणारे, आरपार जाणारे ४७. नाश ४८. पोट ४९. पावसाची झड ५०. अपत्यांमध्ये असा फरक आता कालबाह्य ५२. गच्च गोळा ५३. वितरण ५५. डोंगराचा तुटलेला भाग ५७. आवक --- ५८. चंद्र ६१. बगीचा ६३. शिकारी ६५. शंकराजवळचे चर्मवाद्य ६६. तीव्र ऊन ६७. सूर्यालाही दिसणे दुर्मिळ ते हा पाहू शकतो अशी म्हण आहे ६८. तरतूद ७०. मला ७१. अटीतटीतील आश्वासन ७२. पद्धत ७३. पांडवांचे चुलत भाऊ ७४. तर्री ७६. वक्र ७७. जिवलग मित्र ८०. तारुण्य ८१. नशीब ८२. नाकीडोळा ८३. सूट ८४. प्रफुल्लित

उभे शब्द

२. गाजाबाजा ३. खाणाखुणांवरून शोधाशोध ४. हाडांचा पिंजरा ५. भीती ६. हत्तीचे तोंड असलेला ७. खूप ८. चाणक्यनीती ९. दिवसाचा चोविसावा भाग १३. माई आणि अक्काची मोठी बहीण १५. मराठी कडधान्य, हिंदी घागरीत! १६. अखंड १७. गावगप्पांची जागा १८. सेवक १९. नेहमी २०. मऊ २२. शंभर २४. दुनिया, विश्व २५. शिकार २७. उलटी, ओकारी २९. जीभ, जिव्हा ३२. जादू करणारा ३४. हजार किलो ३५. अट, शर्त ३७. निवांत, रेंगाळत- --- गमत ३९. छिद्र ४१. डौलदार चालीची ४२. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास ४४. कैलासभूमी ४६. द्वार ४८. सोडवून दाखविलेले गणित ४९. बेचव, पाणीदार ५०. माजलेला, उर्मट ५१. गर, मगज ५४. तरतरी ५६. पदार्थ झाकून ठेवण्याचे पात्र ५९. अटीची भाषा ६०. कट्टर व्यक्ती ६२. अक्कल नसलेला गरजू ६३. जाणकार, पारख करणारा ६४. पुन्हा ६७. पांढुरका रंग ६९. एक गळीत धान्य ७०. अभिप्राय ७१. तोपर्यंत (हिंदी) ७२. पद्धत, पायंडा ७३. कौले घातलेले घर ७५. पक्ष्यांचा राजा ७६. खराब ७८. विशेष ७९. राहुटी



### शब्दकोडे क्र. 24 चे उत्तर

आडवे उत्तर

१.बाळ गंगाधर टिळक ६.समोरासमोर १०.समर ११.दशक १२.सटरफटर १५.गो १६.कनक १९.रस्ता २०.दमदाटी २२.शीर २३.बेशरम २५.नजरानजर २९.मटकी ३१.मदत ३३.नग ३४.पास ३७.तगमग ३९.अदबशीर ४१.हमाल ४३.दामिनी ४४.गणक ४६.रट्टा ४७.जान ४९.रमण ५०.सवतीमत्सर ५३अ.नख ५४.जमविणे ५६.जर ५७.मनोहर ५९.रमल ६१.जीव ६३.गीत ६५.रवाना ६७.रन ६९.तप ७१.नरमाई ७३.टणक ७४.वानवा ७६.चाक ७७.चलन वलन ८०.साधना ८२.टवका ८३.रजक ८४.समाधानकारक

उभे उत्तर

१.बावनकशी २.गंगोदक ३.धडक ४.टिपूस ५.कबरस्तान ६.सपाट ७.रास ८.समजदार ९.मोर १३.टर १४.रदन १७.नरम १८.शरम २१.मजल दरमजल २३.बेकी २४.मदतनीस २६.जनगणमन २७.राग २८.कसर काढणे ३०.टपाल ३२.तग ३४.पाशी ३५.सहजासहजी ३६.धंदा ३८.मगर ४०.बट्टा ४२.मानव ४५.कणखर ४८.समरगीत ५१.तीज ५२.रम ५३.जहर ५५.वितरण ५८.रवानगी ६०.मलई ६२.वदन ६४.तपमान ६६.नार ६८.नकलाकार ७०.नवल ७२.मानधन ७३.टकटक ७४.वापर ७५.वाचक ७८.वर्ण ७९.नस ८०.साधा ८१.नाका

## वृत्तविशेष...

### जतमध्ये निवडणुकीला हिंसक वळण, अजितदादांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराच्या घरावर हल्ला

**दैनिक आपला विदर्भ**

**सांगली/प्रतिनिधी :** नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्रात उद्या मतदान होणार आहे. मतदानाच्या एक दिवस आधी जत नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराला हिंसक वळण लागलं. इथं राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सुरेश शिंदे यांच्या घरावर आणि गाडीवर पहाटेच्या सुमारास अज्ञात व्यक्तींकडून दगडफेक करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

या हल्ल्यामुळे निवडणुकीच्या रणधुमाळीत तणाव वाढला आहे. पहाटेच्या वेळी काही अज्ञात व्यक्तींनी अचानकपणे सुरेश शिंदे यांच्या घरावर दगडफेक करण्यास सुरुवात केली. या हल्ल्यामध्ये सुरेश शिंदे यांच्या घराचं आणि गाडीचं मोठं नुकसान झालं आहे. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

घडलेल्या या हिंसक प्रकारामुळे राष्ट्रवादी (अजित पवार गट) आक्रमक झाला असून, त्यांनी थेट सत्ताधारी गटावर गंभीर आरोप केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते आणि माजी आमदार विलासराव जगताप यांनी हा हल्ला भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आल्याचा गंभीर आरोप केला आहे. निवडणुकीत पराभवाच्या भीतीने अशा प्रकारे भ्याड हल्ला करत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

या हल्ल्यामुळे जत शहरातील राजकीय वातावरण अधिकच तापलं आहे. दोन्ही गटांचे कार्यकर्ते समोरासमोर येण्याची शक्यता असल्याने शहरात तणावपूर्ण शांतता आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून, हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू केला आहे. मतदानाच्या आदल्या दिवशी अशाप्रकारे हल्ला झाल्याने तर्क वितर्कांना उधाण आलं आहे.

### विपुल अमृतलाल शाह यांनी लाँच केलं नवं म्युझिक लेबल, सिद्धिविनायक मंदिरात 'शुभारंभ' गाण्याचं उद्घाटन!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** विपुल अमृतलाल शाह आता त्यांचं क्रिएटिव्ह कार्य अधिक विस्तारत आहेत. त्यांच्या बॅनर सनशाइन पिक्चर्स सोबत त्यांनी नवं म्युझिक लेबल 'सनशाइन म्युझिक' लॉन्च केलं आहे. प्रभावी सिनेमे आणि लक्षात राहतील असे साउंडट्रॅक्स तयार करण्यासाठी ओळखले जाणारे शाह आता एका नवीन क्षेत्रात प्रवेश करत आहेत. या लेबलचा उद्देश नवीन संगीत प्रतिभा शोधणे, त्यांना संधी देणे आणि त्यांना पुढे नेणे हा आहे. लेबलची पहिली प्रस्तुती 'शुभारंभ' आज मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरात एका विशेष समारंभात लॉन्च करण्यात आली, जिथे विपुल अमृतलाल शाह आणि शेफाली शाह उपस्थित होते. ही सुरुवात खरोखर शुभ आणि हृदयाला भिडणारी वाटली. शुभारंभ या गाण्याद्वारे सनशाइन म्युझिक पुढे कोणत्या प्रकारचं विविध आणि दर्जे दार कंटेंट देणार आहे, याची झलक मिळते.

या प्रकल्पाचे सह–निर्माता आशिन ए. शाह आहेत, तर म्युझिक हेड सुरेश थॉमस यांनी या पहिल्या मोठ्या रिलीजची क्रिएटिव्ह डायरेक्शन आणि संपूर्ण लॉन्च प्रक्रिया सांभाळली आहे. शाह यांच्या चित्रपटांना नेहमीच त्यांच्या सोलफुल आणि मधुर संगीतासाठी ओळखलं जातं. नमस्ते लंडन, लंडन ड्रीम्स, ॲक्शन रिप्ले आणि सिंग इज किंग सारख्या संगीतप्रमुख चित्रपटांना आजही त्यांच्या संगीतामुळे मोठी लोकप्रियता आहे. विपुल अमृतलाल शाह नेहमीच परिणामकारक आणि विविध प्रकारच्या कथा सांगणारे सिनेमे बनवत आले आहेत. म्हणूनच ते आज भारतीय मनोरंजन उद्योगातील सर्वात आदरणीय आणि यशस्वी निर्मात्यांपैकी एक मानले जातात.

### मुलगा व्हावा म्हणून छळ; पैशांच्या मागणीला कंटाळून २५ वर्षीय गर्भवतीची आत्महत्या

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** मुलाच्या हव्यासापोटी आणि पैशांच्या सततच्या मागणीमुळे त्रस्त झालेल्या २५ वर्षीय गर्भवती विवाहितेने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना नांदेडमध्ये समोर आली आहे. प्रतीक्षा भोसले असे मृत विवाहितेचे नाव असून, तिला पहिली मुलगी आहे. मात्र मुलगा हवा म्हणून तिच्यावर सासरकडून सातत्याने मानसिक आणि शारीरिक छळ होत असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.या प्रकरणात पतीसह चार जणांविरुद्ध विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार राजेश्वर वानखेडे यांनी सांगितले की, मुलगी प्रतीक्षाचा विवाह २०२३ मध्ये लक्ष्मण भोसले याच्याशी झाला होता. लग्नावेळी साडेचार लाख रुपये हुंडा दिला होता. सुरुवातीचे काही दिवस सर्व काही सुरळीत चालले, पण नंतर पती लक्ष्मण भोसले दारूच्या नशेत प्रतिक्षाला मारहाण करू लागला.नणंद माधुरी किशोर देशमुख, दीपाली रामराव देशमुख आणि भाग्यश्री सूरज देशमुख ह्या फोनवरून शिवीगाळ करून प्रतिक्षाल सतावत असल्याची तक्रारही करण्यात आली आहे.

प्रतिक्षाला पहिली मुलगी झाल्यानंतर छळ आणखी वाढला. मुलगा हवा म्हणून तिच्यावर ओरड, शिवीगाळ आणि पैशांची मागणी केली जात होती. स्कूल व्हॅन घेण्यासाठी पाच लाख रुपये आणण्याचा दबाव टाकण्यात आला. प्रतीक्षेच्या कुटुंबाने ५० हजार रुपये दिले, परंतु तरीही त्रास थांबला नाही. दरम्यान, प्रतीक्षा दुसऱ्यांदा गर्भवती राहिली असताना झालेल्या मारहाणीमुळे तिचा गर्भपात झाल्याचा कुटुंबाचा आरोप आहे. तरीही सासरकडच्या वागणुकीत कोणताही बदल झाला नाही.

# लोणार नगरपरिषद निवडणूक : तिरंगी लढत तापली

## शिंदे गटाची जोरदार आघाडी : मापारी यांच्या प्रचंड रॅलीने विरोधकांची झोप उडाली

**दैनिक आपला विदर्भ**






**लोणार/प्रतिनिधी :** २ डिसेंबर रोजी होणाऱ्या लोणार नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचली असून, स्थानिक राजकारण तापले आहे. शिवसेना (शिंदे गट), काँग्रेस व शिवसेना (ठाकरे गट) यांच्या तिरंगी लढतीत संघर्ष चुरशीचा बनला असला तरी, सध्याच्या घडीला शिवसेना शिंदे गटाने घेतलेली आघाडी विरोधकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

निवडणुकीच्या आदल्या दिवशी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संगिताताई गोविंद मापारी यांच्या समर्थनार्थ निघालेल्या विराट प्रचार रॅलीने संपूर्ण शहर गाजवले. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर. जिल्हा प्रमुख बळीराम मापारी यांच्या नेतृत्वातील या रॅलीने विरोधकांना अक्षरशः धडकी भरली.

रायमुलकरजाधव यांचे नेतृत्व, विकासकामांची चुणूक केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर यांच्या सक्रियतेमुळे शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवीन जोश निर्माण झाला आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देत अनेक विकासकामांना गती मिळाली असल्याने नागरिकांचा विश्वास शिंदे गटावर वाढत आहे.

गेल्या दहा वर्षांपासून काँग्रेसच्या ताब्यात असलेल्या नगरपरिषदेने रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी उसळली आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांविषयी असलेल्या आक्रोशाचा फायदा शिंदे गटाला होताना दिसत आहे.

मापारी कुटुंबाची लोकप्रियता ठरत आहे जमेची बाजू शहरातील सामाजिक कामात आघाडीवर असलेल्या मापारी कुटुंबावर लोकांचा प्रचंड विश्वास आहे. नागरिकांशी जुळलेली नाळ आणि सेवाभावाचा वारसा नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.संगिताताई मापारी यांना मोठे बळ देत आहे.

राजकीय वर्तुळात काँग्रेस उमेदवारांबद्दल नाराजी वाढत असून विरोधकांचा आत्मविश्वास डळमळीत झाल्याचे दिसून येत आहे. सध्याच्या परिस्थितीकडे पाहता तिरंगी लढत रंगत असली तरी शिवसेना शिंदे गटाची बाजू भक्कम असल्याचे स्पष्ट संकेत दिसून येते आहेत. विकास कामांवरचा आधार, प्रभावी नेतृत्व आणि संघटनेची मजबूत बांधणी यामुळे विजयाचा मार्ग सुकर होत असल्याचे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे.

प्रचार रॅलीत महिलांचा आणि नागरिकांचा अभूतपूर्व सहभाग १ डिसेंबर रोजी काढण्यात आलेल्या भव्य प्रचार रॅलीला महिलांसह नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत हजारोंच्या संख्येने सहभाग नोंदवला. शहरभर भरलेली मानवी गर्दी पाहून विरोधकांची मात्र घामाघूम अवस्था झाली. रॅलीत माजी आमदार संजय रायमुलकर, माधवराव जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पुण्यातील तरुणांचं मोठं कांड; दरवाजा उघडताच घरातील दृश्य पाहून पोलीसही थक्क

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातून एक अजब घटना समोर आली आहे. पुणे शहरात हुक्का पार्लरवर बंदी आहे. अशात कारवाईच्या भीतीने चक्क एका घरामध्ये हुक्का पार्लर चालवण्याचा प्रकार विमाननगर परिसरात उघडकीस आला आहे. विमाननगर पोलिसांनी छापा टाकून या अवैध हुक्का पार्लरचा पर्दाफाश केला असून, ३४ हुक्का पात्रे आणि सुगंधी तंबाखू असा मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी उत्तर प्रदेशातील मूळ रहिवासी असलेल्या तिघांना ताब्यात घेतलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विमाननगर पोलीस ठाण्याचे पथक गस्त घालत असताना, पोलीस उपनिरीक्षक नितीन राठोड यांना म्हाडा कॉलनीतील एका सदनिकेत छुप्या पद्धतीने हुक्का पार्लर चालवले जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारावर, पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी छापा टाकला. आरोपींना ताब्यात घेण्यात आलं असून, त्यांच्याविरुद्ध तंबाखूजन्य उत्पादने अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासात अशी माहिती समोर आली आहे की, आरोपी बाहेर उघडपणे हुक्का पार्लर चालवण्याची हिंमत करत नव्हते. त्यामुळे पोलीस कारवाई करतील या भीतीपोटी त्यांनी घरातच सुरक्षित ठिकाण म्हणून हुक्का पार्लर थाटले होते. विशेष म्हणजे, आरोपी ग्राहक मागतील त्याप्रमाणे ऑनलाइन मागणीनुसार हुक्का पुरवत होते. पोलीस कर्मचारी हरिप्रसाद पुंडे यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव आणि गुन्हे शाखेचे निरीक्षक शरद शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही महत्त्वपूर्ण कारवाई केली. दरम्यान, मुंबईतील कमला मिल परिसरातील एका हॉटेलमध्ये हुक्का पार्लरमुळे आग लागून अनेक नागरिकांचा मृत्यू झाला होता. या गंभीर घटनेची दखल घेऊन राज्य सरकारने हुक्का पार्लरवर बंदी घातली आहे.

### आळंदीत अजित पवारांनी माऊलींचे बाहेरूनच दर्शन का घेतले? मंदिरात प्रवेश का केला नाही?

पिंपरी–चिंचवड : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज आळंदी येथे ज्ञानेश्वर माऊलींचे दर्शन मंदिराबाहेरूनच घेतल्याने चर्चेला उधाण आले. प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने त्यांचा संपूर्ण दिवस दौऱ्यांनी गजबजलेला होता. राजगुरूनगर येथील प्रचारसभा आटोपून अजित पवार आळंदी येथे पोहोचले. सभेला उशीर झाल्याने पुढील कार्यक्रम वेळेत गाठण्यासाठी त्यांना घाई होती. अजित पवार हे वेळेचे काटेकोर पालन करणारे नेते म्हणून ओळखले जातात, त्यामुळे त्यांना पुढील सभास्थळाला पोहोचणे महत्त्वाचे होते.माऊलींच्या मंदिरासमोरून जात असताना आळंदी देवस्थानचे विश्वस्त त्यांच्यासोबत होते.

## सक्षमवर गोळ्या झाडण्याच्या दोन तास आधीच...; आंचलच्या आईबाबत धक्कादायक खुलासा, नेमकं काय घडलं होतं?

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेडमध्ये अंतरजातीय प्रेमसंबंधातून सक्षम ताटे या १९ वर्षीय युवकाची निर्घृण हत्या करण्यात आली. हा खून सक्षमची प्रेयसी आंचल मामीडवार हिच्या वडिलांनी आणि भावांनी केला आहे. या भयंकर घटनेनंतर आंचलने सक्षमच्या पार्थिवाशी विवाह केला. एवढ्यावर न थांबता तिने स्वत:च्या वडील आणि दोन भावांविरोधात पोलिसात धाडसाने साक्षही दिली आहे. सक्षमच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणीदेखील आंचलने केली आहे. तर पोलिसांनी (इद्दत्म) या प्रकरणात सर्व आरोपींना अवघ्या १२ तासात अटक केली आहे.

घटनेनंतर आंचल थेट सक्षमच्या घरी पोहोचली. आपल्या प्रियकराच्या पार्थिवाशी तिने विवाह केला. ''सक्षम मृत्यूनंतरही जिंकलाष्ठ आणि माझे घरचे हरले,'' असे भावनिक उद्गार तिने काढले. अंत्यविधीपूर्वी सक्षमच्या पार्थिवासमोरच त्याच्या नावाचे कुंकू कपाळावर लावून तिने सर्वांना स्तब्ध केले. ''मी आयुष्यभर सक्षमच्या घरात त्याची पत्नी म्हणूनच राहणार,'' असा ठाम निर्धार तिने व्यक्त केला.

या प्रकरणात आता आणखी मोठा आणि धक्कादायक खुलासा झाला आहे. सक्षमची हत्या होण्याच्या दोन तास आधीच आंचलची आई जयश्री मामीडवार सक्षमच्या घरी गेल्याची माहिती समोर येत आहे. तेथे जाऊन तिने सक्षमला धमकी दिली आणि आमच्या पोरीपासून दूर राहा, असे सांगितले. यानंतर अवघ्या दोन तासांनी सक्षम ताटे याची आंचल मामीडवार हिच्या वडिलांनी आणि भावांनी हत्या केली.

या प्रकरणावर सक्षमची आई संगीता ताटे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. सक्षमच्या मृत्यूच्या दुसऱ्या दिवशी आंचल मला पोलीस स्टेशनमध्ये भेटली. ती खूप रडत होती आणि माझ्याबरोबरच ती घरी आली. माझ्या गळ्यात पडून ती रडली आणि म्हणाली की मी तुमच्याच घरी राहीन. त्या दिवशी मी तिला माझ्या घरी घेऊन आले. जसं मी माझ्या मुलावर प्रेम केलं, तसंच प्रेम मी आंचलवरही करीन. तिला मुलगी न मानता, सक्षमप्रमाणेच माझा मुलगा मानेल. तिच्यात मला सक्षम दिसतो. मी तिच्यावर माझ्या स्वत:च्या लेकीसारखं प्रेम करेन. जोपर्यंत माझा जीव आहे, तोपर्यंत मी तिच्यावर प्रेम करत राहीन. तिने माझी साथ सोडली नाही, तर मी देखील तिची साथ आयुष्यभर सोडणार नाही. माझी एकच मागणी आहे की, माझ्या मुलाला न्याय मिळावा,'' असे त्यांनी म्हटले आहे.

## तुम्ही माझं ऐकाल तर मी तुमचं ऐकतो, धमकी नाही ही विनंती; मतदारांना आवाहन करताना नेमकं काय म्हणाले अजित पवार?

**दैनिक आपला विदर्भ**



**पुणे/प्रतिनिधी :** 'तुम्ही माझे ऐकाल तर मी तुमचे ऐकेन, ही माझी फक्त विनंती आहे, नाहीतर म्हणाल दादांनी धमकी दिली...' असं वक्तव्य अजित पवारांनी केलं. तुम्ही माझी विनंती ऐका, मी तुमची विनंती ऐकेन असंही अजित पवार म्हणाले. विकास हवा असेल तर राष्ट्रवादीच्या सगळ्या उमेदवारांना निवडून द्या असं आवाहन अजित पवारांनी केलं. अजित पवारांनी राजगुरूनगरमध्ये राष्ट्रवादीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतली. त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केलं होतं.

माणुसकी म्हणून जगत असताना जातीच्या पलीकडे जाऊन विचार करायला हवा. हुतात्मा राजगुरू यांचं बलिदान भारतातील कोणीच विसरु शकत नाही. या विचारांवर आपण पुढं जातोय असं अजित पवार म्हणाले.

अजित पवार म्हणाले की, ''सार्वजनिक वाहतूक व्यवस्था चांगली केली तरच विकास होऊ शकतो. ती चांगली असेल तरच वाहतूक कोंडी सुटू शकते, नाहीतर ती सुटणारच नाही. आम्ही आता चाकणपर्यंत मेट्रो आणली, ती पुढे मी राजगुरुनगरपर्यंत नेऊ शकतो. हे फक्त 'मी करू शकतो' असं म्हटलं. माझं तुम्ही ऐकलं तर तुमचं मी ऐकेण. म्हणजे ही विनंती आहे. नाहीतर म्हणाल की दादांनी धमकी दिली म्हणून. मी आपली विनंती करतोय. तुम्ही माझी विनंती ऐका, मी तुमची विनंती ऐकेन.''

अदित पवार पुढे म्हणाले की, ''मी कामाचा माणूस आहे, माझी प्रशासनावर पकड आहे. मात्र काही लोक माझ्यावर आरोप करतात. मी असा आहे, तसा आहे, ७० हजार कोटींचा भ्रष्टाचार केला. पण मी एक रुपयांचा मिंधा नाही. तुम्ही दाखवून द्या की मी काम करताना कोणाकडून पैसे घेतले, किवा चिरीमिरी द्यावी लागली. उलट प्रशासन मला टरकून राहते.

अजित पवार यांनी राजगुरुनगरवासियांना अप्रत्यक्ष प्रलोभन दिल्याचं दिसून आलं. ते म्हणाले की, ''येत्या हिवाळी अधिवेशनात तुमचा प्रश्न मार्गी लावतो. आता आचारसंहिता असल्यानं मला स्पष्टपणे बोलता येणार नाही. मात्र या अधिवेशनात तुमचा प्रश्न सोडवण्यासाठी किती निधी लागेल, त्यासाठी काय करावं लागेल, हे पाहतो. पण आचारसंहितेमध्ये मला यावर बोलता येणार नाही.''

# अकोल्यात दिवसाढवळ्या तरुणाला निर्घृणपणे संपवले

## शेगाव–अकोट रस्त्यावरील घटना, परिसरात खळबळ

**दैनिक आपला विदर्भ**

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यातील शेगाव–अकोट रस्त्यावर प्रेम प्रकरणातून एका तरुणाची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. गौरव बायस्कार असं हत्या करण्यात आलेल्या तरुणाचं नाव. प्रेम प्रकरणातून गौरवची ४ जणांनी चाकूने भोसकून हत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तर मारेकरी हे लोहाऱ्यातील मोरे कुटुंबातीलच असल्याचे समोर आले आहे. तसेच इतर दोन जणांचाही या हत्येमध्ये समावेश असल्याचा समजते आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मोरे कुटुंबातील एक अल्पवयीन मुलगा, त्याचे वडील आणि इतर २ जण असे चार जणांनी एकत्रित गौरवची हत्या केली आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट–शेगाव रस्त्यावरील अंदुरा फाट्यावर भर दिवसा हे हत्याकांड घडले आहे. या प्रकरणात उरळ पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतलं असल्याची माहिती. तर मारेकऱ्यांनी जवळील चाकूने गौरव बायस्कार याच्यावर सपासप चाकूने वार करीत गंभीर स्वरूपात जखमी केलंय. या घटनेत गौरवचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान, या प्रकरणात उरळ पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरूये. मात्र, या घटनेने अंदुरा परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.




प्रेम प्रकरणातून गौरवची हत्या झाल्याचे बोलले जाते. परंतु अद्यापही हत्येमागील मूळ कारण पोलिसांनी स्पष्ट केलं नाहीये. निंबा फाटा ते तेल्हारा मार्गावर कारंजा (रमजानपूर) फाट्याजवळ ही घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच उरळ पोलीस स्टेशनचे ठाणेदार पंकज कांबळे, त्यांचे सहकारी पोलिस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले असून मृतदेह शवविच्छेदन प्रक्रियेसाठी अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणात दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. तर पुढील तपास सध्या करत आहे.